# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक ५२ / २०२३

'Non DDF' योजना अंतर्गत केलेल्या कामाचा परतावा मिळण्याबाबत

श्री. शाहू यंत्रमाग सहकारी संस्था मर्यादीत ........................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, इचलकरंजी (महावितरण) ........................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) मुकुंद माळी, प्रतिनिधी
२) राजेंद्र घनकुटे, प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- १) प्रशांत राठी, कार्यकारी अभियंता, इचलकरंजी
२) एन. डी. आहूजा, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, इचलकरंजी

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १४ जुलै २०२३

आदेश पारित दिनांक :- ३१ जुलै २०२३

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २२ डिसेंबर २०२२ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ९ मे २०२३ रोजी दाखल केले.

२.	मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक ३९/2020) दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजीच्या बहुमताच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*"२) तक्रारदार ग्राहकांनी पायाभूत आराखडा उभा करण्यासाठी केलेल्या खर्चाच्या रक्कम रु.३,७७,१५०/- मधून ५.२८% Depreciated Value Straight Line Method ने वजा करुन येणारी रक्कम वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकास द्यावी. दि.१४.१२.२०१८ पासून सदर सर्व रक्कम परत करेपर्यंत द.सा.द.शे. ४.६५% दराने सदर रक्कम व्याजासह परत द्यावी."*

३.	अपिलार्थीच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व दिनांक १४ जुलै २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक २७ एप्रिल २००९ पासून मंजूर भार ४५ एचपी पॉवरलूम औद्योगिक ग्राहक (क्र.२५०६२०१९२५४२) होते (पी.डी. दिनांक १४ डिसेंबर २०१८). अपिलार्थीनी दिनांक ३० जानेवारी २००८ रोजी नवीन वीज जोडणीची मागणी केली. सदर वीज जोडणीची मागणी 'Non DDF' योजनेतून मंजूर झाल्यावर महावितरणने दिनांक २४ फेब्रुवारी २००९ रोजी कोटेशन दिले. अपिलार्थीने दिनांक ४ मार्च २००९ रोजी कोटेशनचा भरणा केला. त्यानंतर मंजूर अंदाजपत्रकानूसार उच्चदाबवाहिनी ०.१८ कि.मी. रोहीत्र ६३ केव्हीए लघुदाब वाहिनी ०.६ कि.मी.चे अंदाजपत्रकानुसार, रक्कम रु.३,७७,१५०/- चे पायाभूत आराखडा उभा करण्याचे काम पूर्ण झाल्यावर दिनांक २७ एप्रिल २००९ रोजी वीज जोडणी देण्यात आली. अपिलार्थीनी सदर काम 'Non DDF' योजनेतून परवानेधारक ठेकेदार मेसर्स. देवकिनंदन इलेक्ट्रिकल, इचलकरंजी याच्याकडून महावितरणच्या देखरेखीखाली स्वखर्चाने केलेले आहे.

- प्रतिवादी महावितरण कंपनीने ग्राहकाच्या वीज देयकाच्या थकबाकीपोटी ऑगष्ट २०१८ मध्ये सदरची वीज जोडणी तात्पुरती बंद केली. त्यानंतर दिनांक १४ डिसेंबर २०१८ रोजी कायमस्वरूपी खंडीत केली. दिनांक ५ डिसेंबर २०१९ रोजी उपकार्यकारी अभियंता, महावितरण, इचलकरंजी यांना लेखी अर्ज केला की, अपिलार्थीने पायाभूत आराखडा उभा करणेसाठी जो खर्च केला त्यातून आमची थकबाकी रु.५०,११४/- वजा करुन शिल्लक रकमेचा परतावा करावा, अशी मागणी केली. त्यावर उपकार्यकारी अभियंता, महावितरण, इचलकरंजी यांनी दिनांक ३० डिसेंबर २०१८ रोजी अपिलार्थीस पत्रान्वये कळविले की, ग्राहक क्र. २५०६२०१९२५४२ ची पॉवरलूम औद्योगिक वीज जोडणी कायमस्वरूपी बंद केली आहे, त्यामुळे अपिलार्थीस नवीन वीज जोडणी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार १ जानेवारी

२०२० रोजी २६ एचपी पॉवरलूम वीज जोडणीसाठी अर्ज केला व दिनांक २७ जानेवारी २०२० रोजी प्रतिवादीने अंदाजपत्रक दिल्यावर त्याचा भरणा अपिलार्थीने दिनांक २८ जानेवारी २०२० रोजी केला. तसेच, दिनांक १० फेब्रुवारी २०२० रोजी ग्राहक क्र. २५०६२३६३९०२३ वरील वीज थकबाकीवरचा दंड भरल्यानंतर नवीन वीज जोडणी देण्यात आली.

➢ अपिलार्थीने नमुद केले की, कार्यकारी अभियंता, इचलकरंजी यांनी २४ फेब्रुवारी २००९ रोजी दिलेल्या वीज भार मंजूरी पत्रातील मजकुरावरून हे स्पष्ट होते की, अपिलार्थीने पायाभूत आराखडा उभा करणेचे काम 'Non DDF/CCRF' योजनेतून केले आहे. याकामी दिनांक ३० मार्च २००९ रोजीच्या करारपत्राचे प्रत दाखल केली आहे त्याने पायाभूत आराखडयाचे काम करताना धारक ठेकेदाराकडून UnderAAR/NON/DDF.CC-RF-1.3% SUPERVISION चा उल्लेख आहे. अपिलार्थीनी प्रतिवादीना दिनांक ३० मार्च २००९ रोजीच्या ग्राहकाच्या वीज जोडणीबाबत पाठविलेल्या पत्राचे उल्लेख केला त्यामध्ये पायाभूत खर्चाबाबत उल्लेख केला आहे.

*"Hence this office has given a temp permission to charge the infrastructure which is executed under ARR/NDDF/CC & RF scheme & release the connections after observing the companys formalities and observe gurarantee of the line and equipments.*

*The work is executed by the consumers at his own cost as per the H.O. Mumbai circular No. CE(Dist.)/DLLL/Circular 22197 date 20.05.2008. Hence the cost of infrastructure may be refunded to the consumer through energy bills, after final decision in the proceedings pending before the Hon'ble Supreme Court and MERC. A separate register be maintained with the record of refund."*

➢ सदर पत्र कार्यकारी अभियंता यांच्या विभागीय लेखापालास देण्यात आले असून त्यांना सुचीत केले आहे की, सदर परतावा केलेली रक्कम, WCR पूर्ण झालेवर, तसे, उपविभागीय कार्यालयास कळविण्यात यावे. तसेच सदर पत्रामध्ये महावितरणचे परिपत्रक क्र.२२१९७ दिनांक २० मे २००८ उल्लेख केला त्यामध्ये नमुद केलेली बाब खालीलप्रमाणे

*"All the infrastructure will be created by MSEDCL and only Schedule of Charges as approved by MERC order dated 08.09.2006 (Case No. 70/2005) will be recovered.*

*If the consumer / group of consumers wants early connections and opt to execute the work and bears the cost of infrastructure then the refund of the cost of infrastructure will be given by way of adjustment through energy bill."*

सदर परिपत्रकानुसार ग्राहक पायाभूत आराखडा उभा करण्यासाठी केलेल्या खर्चाचा परतावा मिळणेस पात्र आहे असे अपिलार्थीने नमुद केले.

- तक्रारदार ग्राहकाने दिनांक ५ डिसेंबर २०१९ रोजी प्रतिवादीकडे सदर वीज जोडणीबाबत Non DDF योजनेतून पायाभूत आराखडा उभा करण्यासाठी केलेल्या खर्चाचा परतावा मिळावा म्हणून दिनांक १५ डिसेंबर २०१९ रोजी अर्ज सादर केला. परंतू सदर खर्चाचा परतावा प्रतिवादीने अपिलार्थीस केला नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक ४ मार्च २0२0 रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) अभिवेदन दाखल केले. कक्षाने दिनांक १४ जुलै २0२0 रोजी च्या आदेशाने सदर अभिवेदन फेटाळून लावले.

- कक्षाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून अपिलार्थीने दिनांक ९ डिसेंबर २0२0 रोजी मंचाकडे अभिवेदन दाखल केले. कोरोना २०१९ च्या महामारीमुळे अपिलार्थीस सदर अभिवेदन दाखल करण्यास उशीर झाला असल्याचे अपिलार्थीने नमुद केले आहे. मंचाने दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीची तक्रार अंशतः मंजूर भाराचे करण्यात आली. तक्रारदार ग्राहकांनी पायाभूत आराखडा उभा करण्यासाठी केलेल्या खर्चाच्या रक्कम रु.३,७७,१५०/- मधून ५.२८% Depreciated Value Straight Line Method ने वजा करून येणारी रक्कम विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकास द्यावी. दि.१४.१२.२०१८ पासून सदर सर्व रक्कम परत करेपर्यंत द.सा.द.शे. ४.६५% दराने सदर रक्कम व्याजासह परत द्यावी असे निर्देश दिलेत.

- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून, अपिलार्थीने दिनांक ९ मे २०२३ रोजी विद्युत लोकपाल यांच्याकडे अभिवेदन दाखल केले.

  - माननीय आयोगाच्या सप्लायकोड रेगुलेशन नुसार संबधीत माननीय आयोगाचा आदेश व महावितरणच्या परिपत्रकानुसार निर्देशीत परतावा कालावधीत दिलेले Non DDF कनेक्शन असलेमुळे Depreciated Value वजा न करता अपिलार्थीने खर्च केलेली रक्कम मिळावी.
  - महावितरणच्या स्वतःच्या अंदाजपत्रकानुसार पायाभूत आराखडा उभा करणेची खर्चाची एकुण रक्कम रु.३,७७,१५०/- दिनांक २७ एप्रिल २००९ पासून परतफेडीच्या तारखेपर्यंत बँक दराने व्याजासह अपिलार्थीस परत केली जावी.

४. प्रतिवादींच्या दिनांक २१ जून २०२३ रोजीच्या उत्तरातील प्रमुख मुद्दे व दिनांक १४ जुलै २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

➢ अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक २७ एप्रिल २००९ पासून ४५ एचपी मंजूर भाराचे पॉवरलूम औद्योगिक ग्राहक (क्र.२५०६२०१९२५४२) आहेत. अपिलार्थींनी दिनांक ३० जानेवारी २००८ रोजी नवीन वीज जोडणीची 'Non DDF' योजनेतून मागणी केली. सदर वीज जोडणीची मागणी 'Non DDF' योजनेतून मंजूर झाल्यावर अपिलार्थीने दिनांक ४ मार्च २००९ रोजी कोटेशनचा भरणा केला. त्यानंतर उच्चदाबवाहिनी ०.१८ कि.मी. रोहीत्र ६३ केव्हीए लघुदाब वाहिनी ०.६ कि.मी. चे पायाभूत आराखडा उभा करण्याचे काम मंजूर अंदाजपत्रकानुसार रक्कम रु.३,७७,१५०/- चे पूर्ण झाल्यावर दिनांक २७ एप्रिल २००९ रोजी वीज जोडणी देण्यात आली.

➢ अपिलार्थीस वीज जोडणी तात्काळ पाहिजे असल्याने, अपिलार्थीने स्वखर्चाने व स्वच्छेने कोणताही विरोध न दर्शविता 'Non DDF' योजनेतून काम केले. सदर रक्कमेचा भरणा अपिलार्थीने महावितरणकडे केलला नाही. विद्युत पुरवठा अधिनियम २००५ मधील विनियम ३.३.३ व ३.३.८. नुसार अपिलार्थीने मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून काम करून घेतले आहे.

➢ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ नुसार विनियम ३.३.८,३.३.३ व ३.३.५ खालील प्रमाणे.

३.३. वीज पुरवठा करण्यासाठी झालेल्या खर्चाची वसूली

*"३.३.८ जर वितरण परवानाधारकाने अर्जदाराला या विनियम ३.३ खालील कामे परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडून करून घेण्याची संमती दिली असेल तर, या कामापैकी ज्या भागाचे काम अर्जदाराने केले असेल त्या कामावरील खर्च वसूल करण्याचा वितरण परवानाधारकाला हक्क राहणार नाही.*

*परंतु तथापि असे की, वितरण परवानाधारकाने अशा कामाच्या केलेल्या पर्यवेक्षणासाठी पर्यवेक्षण आकार, ज्यास कलम १८ खाली आकारांच्या अनुसूचीत मंजूरी देण्यात आली आहे अशा दराने, जो वितरण परवानाधारकास अशी कामे करण्यासाठी जी मंजूरी द्यावी लागली असती तिच्या १५ टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही, वितरण परवानाधारकाला अर्जदाराकडून वसूल करण्याचा हक्क राहील.*

*३.३.३ जर एखादया अर्जदाराला वीज पुरवठा करताना ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा उभाराव्या लागणार असतील तर, विनियम १८ खाली आयोगाने मंजूरी दिलेल्या आकारांच्या अनुसूचीच्या*

*आधारे कामासाठी झालेला सर्व वाजवी खर्च अर्जदाराकडून वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अधिकार राहील.*

*३.३.५ वितरण परवानाधारकाने, या विनियमांची अधिसूचना जारी करण्यांत आल्यानंतर केव्हाही वरील ३.३.३ मध्ये संदर्भ केलेल्या खर्चाची वसूली केली असेल, तर कराराच्या समाप्तीनंतर किंवा या विनियमांना अनुसरून विजेचा पुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात आल्यानंतर, ग्राहकाचा ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधांच्या घटीत मूल्यावर हक्क राहील.*

*परंतू असे की, जेथे अशा सुविधा ग्राहकाने पुरविल्या असतील तेथे, कराराच्या समाप्तीनंतर किंवा या विनियमांना अनुसरून विजेचा पुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात आल्यानंतर, ग्राहक अशा सुविधा ठेऊन घेऊ शकेल.*

*तथापि असे की, अधिनियमाच्या कलम ५६ खालील कोणतीही रक्कम ग्राहक न भरू शकल्यामुळे जर वीज पुरवठा तोडण्यात आला असेल तर, त्या कलमाखाली असणाऱ्या हक्कांखेरीज वितरण परवानाधारकास, या विनियम ३.३.५ खाली ग्राहकास घटीत मुल्याच्या सुविधेपासून मिळण्याचा हक्क असणाऱ्या प्राप्त रक्कमा समायोजीत करण्याचा किंवा वितरण परवानेधारकास अशा ग्राहकाकडून येणे असलेल्या रकमांच्या पोटी अशी घटीत मुल्याची सुविधा ठेवून घेण्याचाही, हक्क राहील."*

- तक्रारदार ग्राहकाने दिनांक ५ डिसेंबर २०१९ रोजी प्रतिवादीकडे सदर वीज जोडणीबाबत Non DDF योजनेतून पायाभूत आराखडा उभा करण्यासाठी केलेल्या खर्चाचा परतावा मिळावा, म्हणून अर्ज सादर केला. परंतू सदर खर्चाचा परतावा प्रतिवादीने अपिलार्थीस केला नाही, म्हणून अपिलार्थीने दिनांक ४ मार्च 2020 रोजी अंर्तगत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) गाऱ्हाणे दाखल केले. कक्षाने दिनांक १४ जुलै 2020 रोजी च्या आदेशाने सदर अभिवेदन फेटाळून लावले.

- अपिलार्थीने दिनांक ९ डिसेंबर 2020 रोजी मंचाकडे अभिवेदन दाखल केले. मंचाने दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीची तक्रार अंशतः मजूर केली. ती परिच्छेद २ मध्ये नमुद केली आहे. अपिलार्थीने मंचाच्या आदेशानुसार दिनांक २७ मार्च २०२३ रोजी धनादेशाद्वारे रक्कम रु.२१६७२५/- चा अपिलार्थीस परतावा करण्यात येऊन मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे.

- काम पुर्ण झाल्याच्या (WCR) अहवालानुसार खर्च रक्कम रु.३७७१५०/- 'Non DDF' योजनेतून मंजूर असून मंजूरी पत्रात "माननीय सर्वोच्च न्यायालय व माननीय आयोगासमोरील कार्यवाहीनंतर पायाभुत

सुविधांची किंमत वीज देयकाद्वारे ग्राहकांना परत केली जाऊ शकते" महावितरणने दिनांक १२ ऑक्टोबर २०१७ रोजी परताव्याबाबतचे परिपत्रक जारी केले. तथापि, अपिलार्थीची ऑगष्ट २०१८ पासून तात्पुरती वीज खंडीत आणि नंतर दिनांक ७ डिसेंबर २०१८ कायमस्वरूपी वीज खंडीत करण्यात आली. अपिलार्थीस दिनांक १० फेब्रुवारी २०२० रोजी त्याच पायाभूत सुविधांसह पुन्हा नवीन कनेक्शन दिले.

➢ उपरोक्त वस्तूस्थिती लक्षात घेता नम्र विनंती आहे की, सध्याच्या अर्जाच्या वस्तुस्थितीनुसार तसेच कायदेशीरदृष्टया कोणतीही योग्यता नाही म्हणून सदर अभिवेदन कृपया फेटाळण्यात यावे.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणने ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक २७ एप्रिल २००९ पासून ४५ एचपी पॉवरलूम (LT Industry Powerloom) चे औद्योगिक ग्राहक (क्र.२५०६२०१९२५४२) होते. अपिलार्थीनी दिनांक ३० जानेवारी २००८ रोजी नवीन वीज जोडणीची मागणी 'Non DDF' योजनेअंतर्गत केली होती. मंजूर अंदाजपत्रकानूसार उच्चदाबवाहिनी ०.१८ कि.मी. रोहीत्र ६३ केव्हीए लघुदाब वाहिनी ०.६ कि.मीचे रक्कम रु.३,७७,१५०/- चे पायाभूत आराखडा उभा करनेचे काम पूर्ण झाल्यावर वीज जोडणी 'Non DDF' योजनेअंतर्गत दिनांक २७ एप्रिल २००९ रोजी देण्यात आली.

७. प्रतिवादी महावितरणने दिनांक २० मे २००८ च्या परिपत्रकानूसार नवीन वीज जोडणी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. परिपत्रकात नमुद केल्यानुसार Non DDF' योजनेअंतर्गत काम केल्यावर ग्राहकास त्या केलेल्या कामाचा योग्य तो परतावा देण्यात येईल. परिपत्रकातील इंग्रजी भाषेचा घोषवारा खालीलप्रमाणे

:-

| Sr.No. | Particulars | Recovery of Charges |
|---|---|---|
| 1 | 1.1 LT Non-domestic, LT residential consumers , consumers or group of LT consumers of Nondomestic & Residential complex where the load is less than 500 KVA and, located within the limits of Areas "A" and "B". | a) All the infrastructure will be created by MSEDCL & only Schedule of Charges as approved by MERC order dated 8th September ' 2006 (case no. 70/2005) will be recovered |
| | 1.2 All LT agriculture consumers | b) If the consumer/ group of consumers wants early connections and opts to execute the work and bears the cost of Infrastructure then the refund of the cost of infrastructure will be given by way of adjustment through energy bills. |
| | 1.3 All LT industrial individual or group consumers | |

८. तसेच महावितरणने खर्च केलेला कामाचा परतावा देण्यासाठी आय टी सेंटर मध्ये प्रोग्राम बनवला आणि त्याबाबतची माहिती परिपत्रक दिनांक २१ डिसेंबर २००९ रोजी फिल्ड ऑफीसरला देण्यात आली तिचा घोषवारा खालीलप्रमाणे :-

> *"This circular is issued on the basis of guidelines circulated to the field offices regarding release of new connections vide circular under ref.2, subject to the final decision in the subject matter pending before the Hon'ble Supreme Court & MERC.*
> *In connection with the above subject it is to informed you that, as per this office circular under ref. 2 in case any consumer or group of consumers wants early connections out of its own volition of choice he may get work executed under DDF (even though work is not dedicated), with their own expenses under MSEDCL supervision & get the refund of these expenses so incurred through their monthly energy bill.*
> *To adopt the above procedure for refund of such charges, the competent authority i.e. Managing Director, MSEDCL has accorded approval to refund the entire expenditure incurred by prospective consumer for release of supply under dedicated distribution facility (even though the work is not expenditure."*

९. मंचाने दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीची तक्रार अंशतः मंजूर करण्यात आली व त्याबाबत दिलेले आदेश मुद्दा क्र.२ मध्ये मांडलेला आहे. अपिलार्थीने माननीय विद्युत लोकपाल

(मुंबई) यांच्याकडे दिनांक ९ मार्च २०२३ रोजी अभिवेदन दाखल केले. अभिवेदन सादर करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

१०. वीज जोडणी Non DDF' योजनेअंर्तगत दिनांक २७ एप्रिल २००९ रोजी देण्यात आली. कारवाईचे कारण हे २००९ या वर्षात घडलेले आहे. तथापि, अपिलार्थीने दिनांक ९ डिसेंबर २020 रोजी मंचाकडे गाऱ्हाणे दाखल केले. दिनांक १० नोव्हेंबर २०१६ चा माननीय सर्वोच्च न्यायालयाचा पायाभूत सुविधांबाबतचा आदेश (केस क्र.२०३४०/२००७) व ह्या केसचा काहीही संबध नाही. कारण हे काम 'Non DDF' योजनेअंर्तगत २००९ रोजी करण्यात आले आहे. अपिलार्थीने अंदाजे ९ वर्षानंतर गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २००६/२०२० मधील विनियम ७.८ नुसार गाऱ्हाणे स्वीकारता येणार नाही. विनियम ७.८ खालील प्रमाणे.

> *"कारवाईचे कारण उद्‌भवलेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत तक्रार दाखल केली नसेल तर मंच गाऱ्हाणे स्वीकारणार नाही."*

११. अपिलार्थींचे अभिवेदन (गाऱ्हाणे) कारवाईचे कारण उद्‌भवलेल्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत दाखल न केल्याने वरील विनियमानुसार कालबाह्य ठरते. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत आहे.

१२. मंचाच्या आदेशाची गुणवत्ता या कडे न जाता तो कायम ठेवण्यात येत आहे व अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

विद्युत लोकपाल मुंबई
खरी प्रत प्रमाणित
श्री. डी. एस. दुबे
सचिव
म.वि.नि.आ.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)